R.No. MHAMAR/25/A3029

R.No. MHAMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : १०५

दि.०५ एप्रिल २०२६,वार: रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## नूतन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी स्वीकारला पदभार

लातूर :- जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दि.०४ मावळत्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्याकडून स्वीकारला. घुगे यांनी स्वागत केले कार्यकाळासाठी

अपर शिल्पा निवासी केशव उपजिल्हाधिकारी लातूरच्या अधिकारी विरोळे, सौदागर तांदळे अधिकारी यावेळीउपस्थित



पदभार श्रीमती ठाकूर- यावेळी त्यांचे व पुढील शुभेच्छा दिल्या. जिल्हाधिकारी करमरकर, उपजिल्हाधिकारी नेटके, रोहयो अहिल्या गाठाळ, उपविभागीय रोहिणी नऱ्हे तहसीलदार यांच्यासह कर्मचारी होते.

## ज्वेल्स, लॉर्ड बुद्धा पार्क येथे चैत्र पौर्णिमा उत्साहात साजरी

नवी मुंबई / के. एच. हनवते :-तथागतांना बुद्धत्व प्राप्त होण्यापूर्वी सिद्धार्थ गौत्तम बुद्ध हे बुद्धगया येथे निरंजना नदीच्या तीरावर वटवृक्षखाली तपचर्या करीत बसलेले असताना सुजाता नावाच्या स्त्रीने सिद्धार्थ गौत्तमास खीर दिली, त्यामुळे चैत्र पौर्णिमा सुजाताची खीरदान म्हणून ओळखले जाते, चैत्र पौर्णिमेचे महत्त्व समजून बौद्धाचार्य : कल्याणराव हनवते, आणि अँड. संजय गायकवाड यांनी उपस्थितांना व लॉर्ड बुद्धा पार्क येथील कर्मचाऱ्यांना खीरदान केली व त्यानंतर कपिलवस्तु बुद्ध विहार सेक्टर १० तसेच मूलगंध कुटी बुद्धविहार जुईनगर या ठिकाणी पण कार्यक्रम स्थळी उपस्थित राहून चैत्र पौर्णिमा श्रवण केली, व बौद्ध उपासक- उपासिकांना पण त्या ठिकाणी खिरदान केली.



*नोट :* सदर ठिकाणी २६ नोव्हेंबर हल्लयात शहीद झालेल्या सैनिकांचा बोर्ड लावलेला आहे तो लवकरात लवकर काढण्यात येवा, आणि लॉर्ड बुद्धा पार्क येथे सोई - सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भात (नमुमपा) महापौर यांना निवेदन *मंगळवार दिनांक : ०७ एप्रिल २०२६ रोजी १२ वाजता देण्यात येणार आहे,* तरी ज्यांना शक्य आहे त्यांनी नवी मुंबई महानगरपालिका येथे उपस्थित रहावे..! असे लॉर्ड बुद्धा कल्याण प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष : कल्याणराव हनवते (पत्रकार-बौद्धाचार्य) यांनी प्रसिद्धी माध्यमाद्वारे कळवले आहे

## 'समग्र शिक्षा' अभियानाच्या भविष्यातील आराखड्याबाबत केंद्र शासनाकडून मार्गदर्शन मागविले -महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेची माहिती

मुंबई-'समग्र शिक्षा' ही केंद्र शासनाची योजना देशात सर्वत्र राबवली जाते. समग्र शिक्षा योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत कार्यान्वित असल्याबाबत केंद्र शासनामार्फत कळविण्यात आलेले होते. या योजनेअंतर्गत राबविण्यात येणारे उपक्रम, निधीची तरतूद, कार्यरत मनुष्यबळ, कार्यक्रमांचा आराखडा, पायाभूत सुविधांशी संबंधित व शैक्षणिक उपक्रम याबाबत तसेच योजनेचा भविष्यातील आराखडा याबाबत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई कार्यालयामार्फत केंद्र शासनाकडे मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. हे मार्गदर्शन अद्याप अप्राप्त आहे. हे अभियान अधिक प्रभावी स्वरूपात पुन्हा येण्याची शक्यता असून याबाबत मार्गदर्शन प्राप्त होताच याबाबतची माहिती देण्यात येईल, असे महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे सह संचालक देवदिास कुलाळ यांनी कळविले आहे.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत 'समग्र शिक्षा' अभियानाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. केंद्र शासनामार्फत २००१-०२ यावर्षी प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या उद्देशाने सर्व शिक्षा अभियान ही योजना सुरू करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान सन २००९-१० मध्ये सुरू झाले. माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढ हा त्याचा प्रमुख उद्देश होता. तसेच अध्यापनात अनुभवाला चालना देण्यासाठी कौशल्य विकसित करणे या उद्देशाने 'शिक्षक शिक्षण' योजना सुरू होती.

केंद्र पुरस्कृत सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान आणि शिक्षक शिक्षण या तीन योजना एकत्रित करून सन २०१८ मध्ये केंद्र शासनामार्फत 'समग्र शिक्षा' योजनेचा प्रारंभ करण्यात आला. सदर योजनेअंतर्गत राज्यात विविध उपक्रम राबवले जातात. हे उपक्रम राबवण्यासाठी राज्यस्तर, जिल्हा, महानगरपालिका, तालुका या स्तरावर विविध पदांवर करार तत्त्वावर व बाह्य संस्थेमार्फत कर्मचारी कार्यरत आहेत.

या योजनेच्या भविष्यातील आराखड्याबाबत केंद्र शासनामार्फत मार्गदर्शन प्राप्त होताच त्याबाबत संबंधित सर्व यंत्रणांना कळविण्यात येईल, असे महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत कळविण्यात आले आहे.

## पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे विद्यार्थ्यांना करिअर, नियोजन, मानसिक आरोग्य व सुरक्षिततेबाबत प्रभावी मार्गदर्शन.

लातूर शहर हे राज्यातील एक महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जाते. दरवर्षी संपूर्ण महाराष्ट्रातूनच नव्हे तर संपूर्ण भारताच्या विविध भागांतून हजारो विद्यार्थी आपल्या शैक्षणिक ध्येयपूर्तीसाठी लातूरमध्ये येतात.

या मार्गदर्शन शिबिर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली.




यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधी, अभ्यासातील नियोजन, स्पर्धेतील मानसिकता, तणाव व्यवस्थापन, नैतिक मूल्ये तसेच वैयक्तिक सुरक्षितता यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर सखोल, समतोल आणि प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

आपल्या भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात यश मिळवण्यासाठी केवळ बुद्धिमत्ता पुरेशी नसून योग्य दिशा, नियोजन आणि शिस्त यांची नितांत गरज आहे. नियोजनबद्ध ध्येय निश्चित करून त्यानुसार सातत्यपूर्ण व प्रामाणिक अभ्यास केल्यास कोणतेही उद्दिष्ट गाठणे शक्य आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमतांचा योग्य अंदाज घेऊन, आवडीच्या क्षेत्रात करिअर घडवावे आणि पारंपरिक चौकटीबाहेरही संधी शोधाव्यात, असेही त्यांनी नमूद केले.

स्पर्धात्मक वातावरणात निर्माण होणाऱ्या ताण-तणावावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, स्पर्धेचा अनावश्यक ताण न घेता सकारात्मक दृष्टीकोनातून तयारी करणे अत्यंत आवश्यक आहे. तणाव हा जीवनाचा एक भाग असला, तरी त्याचे योग्य व्यवस्थापन करता आले, तर तोच तणाव प्रगतीचे साधन ठरू शकतो. यासाठी विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन, संतुलित दिनचर्या, योग्य विश्रांती आणि आवश्यकतेनुसार मार्गदर्शन घेणे गरजेचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहणे अत्यंत आवश्यक आहे, कारण व्यसन हे केवळ आरोग्यालाच नाही, तर करिअर आणि भविष्यासाठीही घातक ठरते. आपल्या स्वप्नांच्या पूर्तीसाठी अटोकाट प्रयत्न करा, अपयश आले तरी खचून जाऊ नका, असे आवाहन करत त्यांनी चिकाटी, जिद्द आणि आत्मविश्वास यांचे महत्त्व अधोरेखित केले.

विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याबाबत त्यांनी चिंता व्यक्त करत सांगितले की, परीक्षेमध्ये अपेक्षित यश न मिळाल्यास नैराश्यातून कोणतेही चुकीचे पाऊल उचलणे हा कोणताही पर्याय नाही. आत्महत्या किंवा गैरमार्ग हे समस्येचे उत्तर नसून, धैर्याने पुन्हा उभे राहणे हाच खरा मार्ग आहे. त्यामुळे प्रत्येक अपयशातून शिकत पुढे जाण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी जोपासावी, असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, फक्त परीक्षा व त्यामध्ये मिळणारे गुण हेच आयुष्याचे अंतिम मोजमाप नाही. शिक्षणाचा खरा उद्देश सर्वांगीण, गुणसंपन्न आणि मूल्याधिष्ठित व्यक्तिमत्त्व घडवणे हा आहे. विद्यार्थ्यांनी चांगल्या सवयी अंगीकाराव्यात, योग्य संगत ठेवावी आणि अल्पवयात कोणत्याही वाम मार्गाचा अवलंब करू नये, असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले. लातूर शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, लातूर पोलीस दल विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी अत्यंत संवेदनशील, सतर्क आणि कटिबद्ध आहे. विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण, तणाव, छेडछाड, दबाव किंवा अन्य समस्या भासल्यास त्यांनी कोणताही संकोच न बाळगता त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा, असे त्यांनी आवाहन केले.

विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेसाठी लातूर पोलिसांनी विशेष पथके स्थापन केली असून, त्यांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यात येत आहेत. मुलींच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तसेच विद्यार्थ्यांनी आवश्यकतेनुसार हेल्पलाईन सेवांचा वापर करावा, असे सांगत लातूर पोलिसांनी खालील संपर्क क्रमांक प्रसिद्ध केली असून विद्यार्थ्यांनी त्यांच्या अडचणीच्या वेळी निसंकोच पणे वापर करावा. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी व तातडीच्या मदतीसाठी संपर्क क्रमांक.

पोलीस नियंत्रण कक्ष : ११२/ ०२३८२-२४२२९६

महिला हेल्पलाईन : १०९१

बाल हेल्पलाईन : १०९८

सायबर गुन्हे हेल्पलाईन : १९३०

विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारची अडचण, संशयास्पद हालचाल किंवा त्रास जाणवल्यास त्वरित व निर्भयपणे या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमात संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ वर्धापन दिनाचा उत्सव नसून, त्यांच्या आयुष्याला सकारात्मक दिशा देणारा, आत्मविश्वास वृद्धिंगत करणारा आणि जबाबदार नागरिक घडविण्याच्या दिशेने प्रेरणा देणारा ठरला.

लातूर पोलीस विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी अहोरात्र तत्पर असून, त्यांच्या सुरक्षित व उज्ज्वल भविष्यासाठी कायम कटिबद्ध आहेत.

## संपादकीय...

# बदलत्या समाजमानाचा 'प्रमोद' झंझावात!

महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या इतिहासात अनेक क्रांतीकारी पावले पडली, पण एकविसाव्या शतकातही एका अनिष्ट प्रथेला मूठमाती देण्यासाठी एका खेड्यातून ठिणगी पडावी लागते, हे विदारक वास्तव आहे. सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील 'प्रमोद झिंजाडे' हे नाव आज अशाच एका मूक क्रांतीचे प्रतीक बनले आहे. त्यांनी पुकारलेला 'विधवा प्रथा बंदी'चा लढा केवळ एका व्यक्तीचा राहिलेला नाही, तर तो आता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेला एक लोकचळवळ (चरींी चीेंशाशपीं) बनला आहे.गेल्या काही दिवसांत आपण राजकीय घडामोडींच्या बातम्यांत इतके गुंतलो आहोत की,समाजाच्या तळागाळात होणारे हे मूलभूत बदल अनेकदा दुर्लक्षित राहतात. झिंजाडे यांनी आपल्या स्वतःच्या मृत्यूनंतर पत्नीला विधवा प्रथेच्या जाचातून वाचवण्यासाठी जे 'मृत्युपत्र' तयार केले, तिथून या लढ्याची सुरुवात झाली. कुंकू पुसणे, बांगड्या फोडणे, मंगळसूत्र तोडणे यांसारख्या प्रथा स्त्रीच्या सन्मानाला ठेच पोहोचवणाऱ्या आहेत, हे त्यांनी समाजाला पटवून दिले.

आज हे लोण इतके पसरले आहे की, हेरवाड (कोल्हापूर) सारख्या ग्रामपंचायतीने ठराव करून या प्रथेवर बंदी घातली आणि त्यानंतर महाराष्ट्र सरकारनेही अशा प्रथा बंद करण्याचे आवाहन केले. एक पत्रकार म्हणून याकडे पाहताना हे जाणवते की, समाज जेव्हा स्वतःहून बदलायला तयार होतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने कायद्याला अर्थ प्राप्त होतो.प्रमोद झिंजाडे यांच्या या उपक्रमाने केवळ स्त्रियांना सन्मान दिला नाही, तर ग्रामीण भागातील वैचारिक दारिद्र्यावरही प्रहार केला आहे. अशा सामाजिक विषयांना जेव्हा आपण मुख्य प्रवाहातील पत्रकारितेत स्थान देतो, तेव्हाच एका सजग समाजाची निर्मिती होते. राजकीय चिखलफेकीच्या बातम्यांच्या गर्दीत, झिंजाडे यांच्यासारख्या माणसांची 'पॉझिटिव्ह' स्टोरी सांगणे ही आजच्या काळाची मोठी गरज आहे.

या चळवळीचे तीन प्रमुख आधारस्तंभ: हेरवाड पॅटर्न क्रांतीची पहिली ठिणगी: कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील 'हेरवाड' ग्रामपंचायतीने ४ मे २०२२ रोजी विधवा प्रथा बंद करण्याचा ऐतिहासिक ठराव संमत केला. पतीच्या निधनानंतर पत्नीचे कुंकू पुसणे, बांगड्या फोडणे आणि मंगळसूत्र तोडणे यांसारख्या अघोरी प्रथांवर बंदी घालणारे हे देशातील पहिले गाव ठरले. या 'हेरवाड पॅटर्न'ने संपूर्ण महाराष्ट्राला एक नवी दिशा दाखवली.

प्रमोद झिंजाडे यांचे अनोखे 'मृत्युपत्र': करमाळ्याचे सामाजिक कार्यकर्ते प्रमोद झिंजाडे यांनी या चळवळीला वैयक्तिक नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. त्यांनी चक्क स्वतःचे 'मृत्युपत्र' तयार केले, ज्यात त्यांनी स्पष्टपणे लिहिले की माझ्या मृत्यूनंतर माझ्या पत्नीला विधवा म्हणून वागवू नये, तिचे सौभाग्य अलंकार काढू नयेत. एका पतीने आपल्या पत्नीच्या सन्मानासाठी घेतलेला हा पुढाकार लाखो लोकांसाठी प्रेरणादायी ठरला.या लोकचळवळीची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने १७ मे २०२२ रोजी एक विशेष 'जीआर' (त्रेीशींीपाशपीं ठशीश्रीींळेप) काढला. यात राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना विधवा प्रथांचे निर्मूलन करण्याचे आणि महिलांना सन्मानाने जगण्याचा अधिकार देण्याचे आवाहन करण्यात आले. लोकशाहीत लोकचळवळीचे रूपांतर धोरणात कसे होते, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

प्रमोद झिंजाडे यांनी सुरू केलेला हा प्रवास आता केवळ एका जिल्ह्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. जेव्हा एखादा 'जीआर' केवळ कागदावर न राहता लोकांच्या मानसिकतेत बदल घडवून आणतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने समाज सुधारतो. राजकीय उलथापालथीच्या बातम्यांच्या पलीकडे जाऊन, अशा 'मूक क्रांती'ची नोंद घेणे हे एका सजग पत्रकाराचे आद्य कर्तव्य आहे.

# अंधश्रद्धा मुक्त गाव अभियान

सध्या महाराष्ट्रात अशोक खरात प्रकरण संदर्भात चाललेले वातावरण व त्यातून बाहेर आलेली प्रकरणे पहाता महाराष्ट्रात येथून पुढे तरी अशा प्रकरणाला आळा घालावा म्हणून महाराष्ट्रातील प्रत्येक गाव अंधश्रद्धा मुक्त गाव म्हणून ग्रामसभेच्या ठरावाद्वारे मंजूर करून त्याचे अंमलबजावणी करण्यासाठी प्रसार आणि प्रचार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पातळीवरून अंधश्रद्धा मुक्त गाव अभियान राबविण्यात संदर्भात परिपत्रक काढावे म्हणून संबंधित यंत्रणेला पत्र व्यवहार केला आहे ते पत्र आपल्या माहितीसाठी सोबत जोडले आहे आपणास जर यावर बातमी होत असेल असे वाटत असेल तर आपण आपल्या लोकप्रिय दैनिक साप्ताहिक मासिक प्रसिद्धी देऊन सहकार्य कराल अशी मी आपणास विनंती करतो कळावे

**प्रमोद झिंजाडे करमाळा**

**सोबत मराठी यांचे पत्र जोडले आहे**

# सत्तेचे समीकरण, उद्योगसत्ता आणि संसद: राघव चड्ढा प्रकरणाचा खरा अर्थ




भारतीय लोकशाहीच्या मंदिरात अर्थात संसदेत उठणारा प्रत्येक आवाज हा केवळ एका व्यक्तीचा नसतो; तो त्या समाजाच्या आशा, आकांक्षा आणि प्रश्नांचा प्रतिनिधी असतो. पण जेव्हा हा आवाज सत्तेच्या आणि उद्योगसत्तेच्या संगनमताला स्पर्श करतो, तेव्हा त्याचे परिणाम केवळ राजकीय न राहता व्यापक स्वरूप धारण करतात. अलीकडील काळात राघव चड्ढा यांच्या संदर्भात घडलेली घटना याच वास्तवाचे एक ठळक उदाहरण म्हणून समोर येते. राघव चड्ढा यांनी संसदेत दोन महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले. हे मुद्दे वरकरणी सामान्य वाटले तरी त्यांच्या परिणामांची व्याप्ती मोठी होती. कारण हे प्रश्न थेट त्या क्षेत्रांशी संबंधित होते, जिथे देशातील प्रभावशाली उद्योगसमूहांचे मोठे आर्थिक हितसंबंध गुंतलेले आहेत. लोकशाहीत प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही तो अधिकार आहे. पण हा अधिकार जेव्हा 'अस्वस्थ' करणाऱ्या प्रश्नांमध्ये बदलतो, तेव्हा सत्ताधाऱ्यांच्या भुवया उंचावतात. चड्ढा यांच्या बाबतीतही काहीसे असेच झाले का, हा प्रश्न आज सामान्य नागरिकांच्या मनात उभा राहतो.

भारतीय अर्थव्यवस्था ही मोठ्या प्रमाणावर उद्योगसमूहांवर आधारित आहे. या उद्योगसमूहांचे योगदान देशाच्या विकासात नाकारता येणार नाही. मात्र, त्याचवेळी राजकारण आणि उद्योग यांच्यातील नाते किती पारदर्शक आहे, हा प्रश्न कायमच उपस्थित राहतो. जेव्हा एखादा लोकप्रतिनिधी अशा मुद्द्यांवर बोट ठेवतो, जे थेट उद्योगसमूहांच्या नफ्यावर परिणाम करू शकतात, तेव्हा त्या आवाजाला 'नियंत्रित' करण्याचा प्रयत्न होतो का? चड्ढा यांच्या प्रकरणाने हा प्रश्न अधिक तीव्रतेने पुढे आणला आहे. राघव चड्ढा यांनी केलेली 'चूक' नेमकी काय होती? त्यांनी नियमांचे उल्लंघन केले का, की त्यांनी 'न बोलण्याच्या' गोष्टी बोलण्याचे धाडस केले? सत्ताधाऱ्यांच्या दृष्टीने ती चूक असू शकते, पण लोकशाहीच्या दृष्टीने ते धाडस ठरते. कारण लोकशाही केवळ बहुमतावर चालत नाही; ती विरोधाच्या आवाजावरही तितकीच अवलंबून असते. जर विरोधकांनी प्रश्न विचारणे थांबवले, तर संसद केवळ एक औपचारिक संस्था उरते. त्यामुळे, चड्ढा यांच्या कृतीकडे केवळ 'शिस्तभंग' म्हणून पाहणे ही एकांगी भूमिका ठरेल.

संसद ही नियमांनी चालणारी संस्था आहे. त्या नियमांचे पालन करणे प्रत्येक सदस्याची जबाबदारी आहे. मात्र, हे नियम कधी कधी अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा घालण्यासाठी वापरले जातात का, हा प्रश्न विचारण्यासारखा आहे. चड्ढा यांच्यावर झालेली कारवाई ही केवळ नियमांचे पालन न केल्यामुळे झाली, की त्यामागे काही राजकीय आणि आर्थिक हितसंबंध होते? या प्रश्नाचे उत्तर स्पष्टपणे समोर येत नसले, तरी शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. आजच्या राजकीय वातावरणात 'अनुकूल' आवाजांना प्रोत्साहन आणि 'प्रतिकूल' आवाजांना मर्यादा घालण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते. हे केवळ एका पक्षापुरते मर्यादित नाही, तर संपूर्ण राजकीय व्यवस्थेचे एक चिंताजनक चित्र आहे. जर लोकशाहीत केवळ 'होय' म्हणणारेच टिकून राहतील, तर 'नाही' म्हणणाऱ्यांचे काय? चड्ढा यांचे प्रकरण या प्रश्नाला अधिक धारदार बनवते.

या संपूर्ण प्रकरणात माध्यमांची भूमिका देखील तितकीच महत्त्वाची आहे. काही माध्यमांनी या घटनेकडे केवळ एक 'विवाद' म्हणून पाहिले, तर काहींनी त्यामागील व्यापक संदर्भ मांडण्याचा प्रयत्न केला. माध्यमांनी केवळ घटनांची माहिती देणे पुरेसे नाही; त्यामागील सत्य उलगडणेही तितकेच आवश्यक आहे. अन्यथा, लोकशाहीचा 'आरसा' हा 'मुखवटा' बनण्याचा धोका निर्माण होतो. या सर्व घडामोडींमध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका ही जनतेची आहे. जर जनता केवळ प्रेक्षक राहिली, तर अशा घटना वारंवार घडत राहतील. पण जर जनता सजग झाली, प्रश्न विचारू लागली, तर सत्ताधाऱ्यांनाही उत्तर द्यावे लागेल. लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित नसते; ती सतत जागरूक राहण्याची प्रक्रिया आहे.

राघव चड्ढा प्रकरणातून काही महत्त्वाचे धडे समोर येतात जसे लोकशाहीत प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे; उद्योगसत्ता आणि राजकारण यांच्यातील नाते अधिक पारदर्शक असावे; संसद ही केवळ नियमांची नव्हे, तर विचारांचीही जागा आहे आणि माध्यमांनी निष्पक्ष आणि सखोल विश्लेषण करणे आवश्यक आहे. इतिहास सांगतो ज्या आवाजांना दाबण्याचा प्रयत्न केला जातो, ते आवाज अधिक ताकदीने परत येतात. राघव चड्ढा यांचे प्रकरण हे केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित नाही; ते लोकशाहीच्या आरोग्याशी संबंधित आहे. जर लोकशाहीत प्रश्न विचारणाऱ्यांना 'गेट आऊट' केले जाईल, तर उद्या कोणताही सामान्य नागरिक आपला आवाज कसा उठवेल? हा प्रश्न केवळ विरोधकांचा नाही, तर प्रत्येक नागरिकाचा आहे. आज गरज आहे ती 'धाडस' आणि 'संवाद' यांची. कारण लोकशाही ही केवळ सत्तेची नाही, तर सत्याचीही असते. प्रश्न विचारणारा समाजच खऱ्या अर्थाने जिवंत असतो. आणि तो जिवंतपणा टिकवून ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

# महसूल अधिकारी, कर्मचाऱ्यांनी गावागावांत जाऊन समस्या सोडवाव्यात मंत्री चंद्रशेखर बावनकुळे




नाशिक (जिमाका वृत्तसेवा) : महसूल विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आठवड्यातून निश्चित केलेल्या दिवशी जिल्ह्यातील गावागावांत जाऊन नागरिकांच्या समस्या सोडवीत गतिमान प्रशासनाचा नागरिकांना अनुभव द्यावा, असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आज दुपारी आयोजित आढावा बैठकीत मंत्री श्री. बावनकुळे बोलत होते. यावेळी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार किशोर दराडे, आमदार नितीन पवार, आमदार दिलीप बनकर, आमदार ड. राहुल ढिकले, आमदार हिरामण खोसकर, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, सहायक जिल्हाधिकारी कश्मिरा संखे, अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण (मालेगाव), हेमांगी पाटील (नाशिक) मुद्रांक जिल्हाधिकारी संदीप आहेर, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख हेमंत सानप, यांच्यासह सर्व उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते 'महसूल हस्तपुस्तिका : महसूल प्रशासनाचे आधुनिक स्वरूप' या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले की, राज्य शासनाने महसूल विभागासाठी नवीन आकृतीबंध निर्माण केला आहे. आवश्यक कार्यालये, पदांना मंजुरी दिली आहे. त्यामुळे महसूल विभागाने नागरिकांना गतिमान सेवा देणे अपेक्षित आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या नागरिकांशी संवाद कार्यक्रमात तक्रारी/निवेदने प्राप्त झाले आहेत. त्यामुळे महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपल्यास्तरावर होणारे निर्णय तातडीने घेतले पाहिजेत.

नागरिकांच्या जमिनीच्या नोंदी, फेरफार, परवानगी आदी कामे विहित कालावधीत आणि पारदर्शकपणे पार पाडावीत. त्यासाठी जबाबदारी निश्चित करावी. त्यासाठी नागपूर जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या 'नागपूर पॅटर्न'चा अभ्यास करावा. जिल्हाधिकाऱ्यांनी सनियंत्रण करीत महसूल विभागाच्या कामांचा वेळोवेळी आढावा घ्यावा. पुढील महिन्यात पुन्हा नाशिक जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार असून त्यावेळी उपविभागीय अधिकारी, तहसील कार्यालयास भेट देऊन पाहणी करणार आहे. तसेच सहदुय्यम निबंधक कार्यालयांमध्ये तातडीने सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करावी, अशाही सूचना त्यांनी दिल्या.

जिल्ह्यात विविध विकास प्रकल्पांसाठी आवश्यक मोजणीसह प्रलंबित कामे भूमी अभिलेख विभागाने तातडीने पूर्ण करावीत. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून द्यावी. जिल्ह्यातील घरकूल, प्रकल्पांसाठी आवश्यक वाळूची मागणी जिल्हा प्रशासनाकडे नोंदवावी. कृत्रिम वाळू निर्मिती प्रकल्पांना प्रोत्साहन द्यावे. गौण खनिज वसुलीवर भर द्यावा. शासकीय कार्यालयांच्या छतांवर सौर ऊर्जा निर्मिती उपकरणे बसवावीत, असे सांगत महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी विविध विषयांचा सविस्तर आढावा घेतला.

शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे, अन्न व औषध प्रशासन मंत्री श्री. झिरवाळ, आमदार श्री. पवार, आमदार श्री. बनकर, आमदार श्री. खोसकर यांनी विविध सूचना केल्या.

जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी सांगितले की, जिल्हाधिकारी कार्यालयात ई ऑफिस टपाल निपटारा विशेष मोहीम राबविण्यात आली. त्यमुळे कामाचा वेग वाढून टपाल प्रलंबित राहण्याच्या प्रमाणात मोठी घट झाली आहे. केपीआय आधारित कामकाजाचा आढावा घेण्यात येत आहे. वार्षिक महसूल वाढ झाली आहे. यंदाच्या वर्षात एकूण वसुली २० कोटी ५२ लाख रुपयांनी वाढली आहे, असे सांगत जिल्हाधिकारी श्री. प्रसाद यांनी अवैध उत्खनन आणि प्रशासकीय कार्यवाही, नवीन वाळू धोरण, इटीएस मोजणी प्रणाली, घरकूल वाळू वाटप आदींची सविस्तर माहिती दिली.

नागरिकांशी संवाद

तत्पूर्वी मंत्री श्री. बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील नियोजन सभागृहात नागरिकांशी संवाद साधत त्यांची निवेदने/तक्रारी स्वीकारल्या. नागरिकांच्या तक्रारी, निवेदनांवर तातडीने कार्यवाहीच्या सूचनाही महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी दिल्या. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण (मालेगाव), हेमांगी पाटील (नाशिक), निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत यांच्यासह महसूल विभागाचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# वैज्ञानिक दृष्टिकोन नसणाऱ्यांना संविधानिक पदावर राहण्यास अधिकार नाही- एडवोकेट असीम सरोदे यांचे प्रतिपादन.




लातूर :भारताच्या संविधानाने अंधश्रद्धा नाकरून वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारला आहे .देशाच्या प्रगतीसाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे .परंतु आजचे सत्ताधारी आणि लोकप्रतिनिधी बुवा– बाबांच्या नादी लागून अंधश्रद्धा पसरवीत आहेत. संविधानाशी त्यांनी द्रोह केला आहे. त्यामुळे त्यांना संविधानिक पदावर राहण्याचा अधिकार नाही असे सांगून त्यांना राष्ट्रपती अथवा राज्यपाल यांनी आपला अधिकार वापरून पदच्युत करावे असे आवाहनही सुप्रसिद्ध कायदेतज्ञ तथा परिवर्तनवादी चळवळीचे भाष्यकार एडवोकेट असीम सरोदे यांनी केले आहे.

लातूर येथील दयानंद महाविद्यालयाच्या सभागृहात मुख्याध्यापक राजकुमार नामवाड सेवागौरव समितीच्या वतीने वैचारिक साहित्याचे अभ्यासक प्रा .डॉ .अशोक नारनवरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या व्याख्यानात एडवोकेट असीम सरोदे बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस परिवर्तनवादी महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले त्यानंतर संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सार्वजनिक वाचन करण्यात आले. मुख्याध्यापक राजकुमार नामवाड यांच्या सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला तसेच लातूर शहर मनपाचे स्वीकृत नूतन नगरसेवक प्रा .डॉ. शिवाजीराव जवळगेकर यांचाही सत्कार करण्यात आला आणि 'प्रबोधयात्री' या वैचारिक ग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

तब्बल दीड तासभर बोलताना आपल्या अभ्यासपूर्ण आणि तर्काधिष्ठित भाषणात अडवोकेट सरोदे पुढे म्हणाले की, संविधानाचे संरक्षण करण्याची जबाबदारी ज्या ज्या सत्ताधारी लोकांवर असते त्यांनी संविधान मोडीत काढण्याचा प्रयत्न चालू केला आहे. त्यामुळे देशातील विचारवंत आणि बुद्धिजीवी वर्ग अस्वस्थ असून भारतीय नागरिकांना जागृत करण्यासाठी ते प्रयत्न करीत आहेत . परंतु त्यांनाही शहरी नक्षलवादी ठरवून तुरुंगात डांबले जात आहे .त्यामुळे आता भारताच्या सजग नागरिकांनीपुढे येऊन




लोकशाही आणि संविधान रक्षणासाठी आंदोलन केले पाहिजे. तरच लोकशाही आणि संविधान टिकेल असे सांगून सत्ताधाऱ्यांनी मालकत्वाची भूमिका सोडून पालकत्व स्वीकारावे असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी थोर इतिहास तज्ञ प्राचार्य डॉ .सोमनाथ रोडे यांचेही समायोचीत भाषण झाले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. डॉ. सोमनाथ कदम यांनी केली प्राध्यापक डॉक्टर मारुती कसाब यांनी सन्मानपदाचे वाचन केले सूत्रसंचालन बालाजी कांबळे आणि नारायण कांबळे यांनी केले तर बालाजी साळुंखे यांनी आभार मानले या कार्यक्रमास जिल्ह्यातील आणि शहरातील सर्व परिवर्तनवादी संघटनांचे कार्यकर्ते, महिला आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री नरसिंग घोडके ,शिरीष दिवेकर , एकनाथ पलमटे ,दत्ता माने ,संग्राम वाघमारे, व्यंकट सरोदे ,जगन्नाथ यमले, बालाजी सोनकांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# क्रीडांगणावरील संघर्ष जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्यास बळ देतो




लातूर,– आयुष्यात यशासोबत अपयशाचाही सामना करावा लागतो; मात्र पराभवानंतर खचून न जाता नव्या जिद्दीने पुन्हा उभे राहण्याची प्रेरणा खेळातून मिळते. शिक्षण आणि क्रीडा या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून, क्रीडांगणावरील संघर्ष विद्यार्थ्यांना जीवनातील विविध आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्याची ताकद देतो, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश प्रवक्त्या तथा नगरसेविका प्रेरणा होनराव यांनी केले.

माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाच्या वतीने आयोजित 'विश्वमैदान २०२६' या आंतर महाविद्यालयीन क्रीडा महोत्सवाच्या बक्षीस वितरण समारंभात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, कर्करोग शल्य चिकित्सक डॉ. ब्रिजमोहन झंवर, भूल तज्ज्ञ डॉ. आरती झंवर, एमयूएचएस उपकेंद्राचे समन्वयक डॉ. संतोष डोपे, संचालक प्रा. तेजस कराड, जिल्हा कारागृह अधीक्षक बी. एन. मुलानी, उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, प्राचार्य सायस मुंढे, डॉ. विराज सोळंके, डॉ. सचिन गरुड, आशा मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना प्रेरणा होनराव म्हणाल्या, 'विश्वमैदान' ही संकल्पनाच प्रेरणादायी आहे. हे नाव उच्चारताच प्रत्येकाच्या आयुष्यातील संघर्षाच्या मैदानाची जाणीव होते. लातूर मध्ये वैद्यकीय शिक्षणाची मोठी चळवळ उभी करून डॉ. हनुमंत कराड यांनी शिक्षणाचा नवा आदर्श निर्माण केला आहे. माईर एमआयटी समूह केवळ शैक्षणिक गुणवत्तेलाच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्कृती आणि क्रीडा क्षेत्रालाही तेवढेच महत्त्व देत असल्याचे त्यांनी नमूद केले.

महिला सक्षमीकरणाचा मुद्दा उपस्थित करताना त्यांनी मुलींच्या क्रीडा क्षेत्रातील वाढत्या सहभागाची गरज अधोरेखित केली. राजकारण आणि प्रशासनात महिलांची उपस्थिती वाढत असली, तरी आपल्या भागातील मुलींचा क्रीडा स्पर्धांमधील सहभाग अजूनही अधिक वाढण्याची आवश्यकता आहे. पुढील वर्षी 'विश्वमैदान' मध्ये मुलींचा अधिकाधिक सहभाग दिसावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मुली मैदानात उतरल्या की त्या जिद्दीने यश संपादन करतात, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कर्करोग शल्य चिकित्सक डॉ. ब्रिजमोहन झंवर म्हणाले की, खेळ केवळ शारीरिक सुदृढता देत नाही, तर तो शिस्त, वेळेचे नियोजन आणि आत्मसंयमही शिकवतो. ही कौशल्ये कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी अत्यावश्यक असतात. विजयाने गर्विष्ठ होता कामा नये आणि पराभवाने खचूनही चालत नाही; कारण प्रत्येक पराभव हा पुढील मोठ्या विजयाची पहिली पायरी असतो, असे ते म्हणाले.

आजची तरुण पिढी मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आभासी जगात अडकत चालल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. या डिजिटल जगातून बाहेर पडून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मैदानावर घाम गाळणे आवश्यक आहे. त्यातूनच शारीरिक आणि मानसिक आरोग्य अधिक सक्षम राहते, असे त्यांनी सांगितले.

डॉ. आरती झंवर यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्यदायी जीवनशैलीवर भर दिला. केवळ पुस्तकी ज्ञानात अडकून न पडता शारीरिक स्वास्थ्याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. पोषणयुक्त आहार, नियमित व्यायाम, मानसिक ताणतणावाचे योग्य नियोजन आणि पुरेशी झोप हे आरोग्याचे चार मूलभूत स्तंभ असल्याचे त्यांनी सांगितले.

आपल्या महाविद्यालयीन जीवनाच्या आठवणींना उजाळा देताना त्यांनी सांगितले की, चार भिंतींच्या आत सतत बसून राहिल्याने शरीराला आवश्यक व्हिटॅमिन डी मिळत नाही आणि थकवा जाणवू लागतो. त्यामुळे मैदानी खेळ हा केवळ विरंगुळा नसून, तो शारीरिक ऊर्जेचा महत्त्वाचा स्रोत आहे. ही खेळाची सवय स्पर्धेपुरती मर्यादित न राहता आयुष्याचा कायमस्वरूपी भाग व्हावी, असे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.

जिल्हा कारागृह अधीक्षक बी. एन. मुलानी म्हणाले की, 'विश्वमैदान २०२६' मुळे महाविद्यालयीन तरुणांमधील क्रीडा वृत्तीला चालना मिळाली आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ खेळण्याची संधी मिळालेली नाही, तर त्यांच्यात आत्मविश्वास, संघभावना आणि स्पर्धात्मकता विकसित झाली आहे. खेळाडू स्वत:साठी नव्हे, तर आपल्या महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करत असतात, ही जाणीवच त्यांना अधिक जबाबदार आणि यशस्वी बनवते, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, 'विश्वमैदान क्रीडा महोत्सव' हा केवळ स्पर्धांचा कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. मैदानावर शिकलेली शिस्त ही जीवनातील प्रगतीची पायाभरणी ठरते. ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना आपले सुप्त गुण आणि क्रीडा कौशल्य दाखवण्यासाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हाच संस्थेचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कोणत्याही स्पर्धेत एकच विजेता असतो; परंतु याचा अर्थ उर्वरित सर्व अपयशी आहेत, असा होत नाही. ज्यांना यश मिळाले नाही, त्यांनी अधिक जिद्दीने आणि सातत्याने सराव करून पुढील संधीसाठी सज्ज व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात क्रीडा प्रतिभा दडलेली असून, तिला योग्य दिशा आणि सुविधा मिळाल्यास हे विद्यार्थी राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावर चमकू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात प्रा. तेजस कराड यांनी पाच दिवसीय 'विश्वमैदान क्रीडा स्पर्धे' चा सविस्तर आढावा सादर केला. यानंतर विविध क्रीडा प्रकारांतील विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते चषक आणि प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रणोती चिंचणसुरे आणि डॉ. प्राजक्ता गायकवाड यांनी केले, तर आभार डॉ. वर्षा सांगळे यांनी मानले. या समारंभास लातूर जिल्ह्यातील विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील नवनियुक्त प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे आणि उपप्राचार्य (कनिष्ठ) प्रा.नितीन वाणी यांचा माजी विद्यार्थी संघटनेकडून सत्कार



लातूर –वेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या नियमित प्राचार्यपदी प्रो.डॉ. सिद्राम डोंगरगे आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी प्रा.नितीन वाणी यांना नुकताच शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन पदभार देण्यात आला आहे.

नवनियुक्त प्राचार्य आणि उपप्राचार्य यांचा महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघटनेकडून शाल आणि पुष्प गुच्छ यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष माजी उपप्राचार्य प्रा.कल्याण कांबळे, सचिव ॲड.इरफान शेख, माजी प्राचार्य डॉ.सिद्धार्थ सूर्यवंशी, माजी विद्यार्थी प्रा.एस. एस.स्वामी, मुख्य समन्वयक डॉ.भास्कर नल्ला रेड्डी, प्रो.डॉ. संजय गवई, डॉ.शीतल येरुळे आणि प्रा.के.आर.सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रा.कल्याण कांबळे म्हणाले की, महाविद्यालयात कार्यरत असलेली माजी विद्यार्थी संघटना व सर्व सन्माननीय सदस्य महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव तत्पर राहील. तसेच सर्व दृष्टीने सहकार्य करेल असे आश्वासित केले.

डॉ.सिद्धार्थ सूर्यवंशी म्हणाले की, आमची विद्यार्थी संघटना महाविद्यालयाच्या विकासाच्या वाटचालीत प्रशासनसोबत सदैव राहील आणि त्यासाठी विविध उपक्रम राबविले जातील असेही ते म्हणाले.

ॲड. इरफान शेख, प्रा.एस. एस.स्वामी, डॉ.भास्कर नल्ला रेड्डी, प्रो.डॉ.संजय गवई, डॉ. शीतल येरुळे आणि प्रा.के. आर.सूर्यवंशी यांनीही नवनियुक्त प्राचार्य आणि उपप्राचार्य यांना शुभेच्छा दिल्या.

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे यांनी माजी विद्यार्थी संघटनेचे पदाधिकारी यांचे आभार मानून येणाऱ्या काळात माजी विद्यार्थ्यांचे मेळावे आयोजित करावे व सर्वांना महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी सहभागी व्हावे. आजी विद्यार्थी महाविद्यालयाचे महत्त्वपूर्ण घटक असतात त्याप्रमाणे विविध क्षेत्रात कार्यरत असलेले माजी विद्यार्थी सुद्धा महाविद्यालयाच्या विकासाच्या वाटचालीमध्ये महत्वपूर्ण योगदान देणारे असतात असे सांगून त्यादृष्टीने माजी विद्यार्थी संघटना सातत्याने प्रयत्नशील राहील असा विश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

उपप्राचार्य प्रा.नितीन कुमार वाणी यांनी माजी विद्यार्थी संघटनेच्या कार्याचे कौतुक केले व सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक माजी विद्यार्थी संघटनेचे समन्वयक डॉ.सदाशिव दंदे यांनी केले तर आभार मुख्य समन्वयक डॉ.भास्कर नल्ला रेड्डी यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अजय गायकवाड, संतोष येंचेवाड, गुरुप्रसाद बिराजदार आणि जलील सय्यद यांनी परिश्रम घेतले.

# प्रामाणिकतेचा आदर्श : रिक्षाचालक लक्ष्मण कांबळे यांनी तीन लाखांची बॅग सुरक्षित परत केली

लातूर :- लातूर शहरात प्रामाणिकपणाचे आणि बौद्ध मूल्यांचे एक सुंदर उदाहरण नुकतेच पाहायला मिळाले. बेंगळुरू येथे आयटी कंपनीत कार्यरत असलेली प्रियंका काशिनाथ जाधव ही युवती आपल्या गावी लातूर येथे आली होती. शहरातील दैनंदिन कामकाज आटोपून ती ऑटो रिक्षातून घरी परतत असताना तिची बॅग रिक्षामध्येच विसरली गेली. त्या बॅगेमध्ये लॅपटॉप, सोने-चांदीचे दागिने व इतर महत्त्वाचे साहित्य असा सुमारे तीन लाखांहून अधिक किमतीचा ऐवज होता.



रिक्षा चालक लक्ष्मण लिंगराम कांबळे यांच्या प्रामाणिकपणामुळे ही घटना एका चांगल्या उदाहरणात रूपांतरित झाली. उदरनिर्वाह करण्यासाठी रिक्षा चालवणारे कांबळे हे केवळ चालक नसून ते भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा लातूरशी केंद्रीय शिक्षक म्हणूनही अनेक वर्षांपासून सक्रिय सहभागी आहेत. त्यांच्या जीवनात बुद्धांच्या करुणा, प्रामाणिकता आणि पंचशील या तत्त्वांचा खोलवर प्रभाव असल्याचे त्यांच्या कृतीतून स्पष्ट झाले.

रिक्षामध्ये सापडलेली बॅग पाहून त्यांनी कोणताही मोह न ठेवता तिच्या मालकाचा शोध घेण्यास सुरुवात केली. अखेर विवेकानंद चौक पोलीस स्टेशनच्या मदतीने त्यांनी प्रियंका जाधव यांचा शोध लावला आणि बॅग सुरक्षितपणे त्यांच्या स्वाधीन केली. विशेष म्हणजे, बॅगेतील सर्व वस्तू जशाच्या तशा परत मिळाल्यामुळे जाधव कुटुंबियांनी मोठे समाधान व्यक्त केले आणि कांबळे यांच्या प्रामाणिकतेचे मनापासून कौतुक केले.

लक्ष्मण कांबळे यांचे हे कृत्य केवळ प्रामाणिकतेचे उदाहरण नसून बौद्ध तत्वज्ञानाच्या आचरणाची जिवंत साक्ष आहे. आजच्या धकाधकीच्या आणि भौतिकतावादी जीवनात अशा घटना समाजास सकारात्मक संदेश देतात. परधन न घेणे, सत्य आचरण आणि करुणा या मूल्यांचे पालन केल्यास समाज अधिक सुसंस्कृत आणि विश्वासार्ह होऊ शकतो, याची जाणीव या घटनेतून होते.

त्यांच्या या आदर्श कृतीमुळे लातूर शहरातच नव्हे, तर सर्वत्र त्यांचे कौतुक होत असून, त्यांनी समाजासमोर प्रामाणिकपणाचा एक उच्च आदर्श निर्माण केला आहे.

या उल्लेखनीय कार्याची दखल घेत विवेकानंद चौक पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी लक्ष्मण कांबळे यांचा सपत्नीक सत्कार करून त्यांच्या प्रामाणिक वृत्तीचा गौरव केला. या वेळी राहुल गायकवाड, सत्यप्रकाश कांबळे, रणवीर देशमुख, सारंग लहुरे, योगेश गायकवाड, सचिन राठोड, गणेश यादव यांसह पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# उमंगच्या व्यासपीठावर दिव्यांगांचा जल्लोष ऑटिझम दिनी प्रतिभेला मिळाली नवी उभारी



लातूर :- जागतिक ऑटिझम दिनाचे औचित्य साधत 'उमंग इन्स्टिट्यूट ऑफ ऑटिझम ण्ड रिसर्च सेंटर'च्या सहाय्या वर्धापन दिनानिमित्त दिव्यांग बालकांसाठी भव्य सांस्कृतिक कार्यक्रम, विविध क्रीडा स्पर्धा आणि मार्गदर्शन उपक्रमाचे आयोजन उत्साहात पार पडले. दिव्यांग नव्हे, तर विशेष हा सकारात्मक संदेश देत समाजात जागरूकता निर्माण करणारा हा कार्यक्रम ठरला. मोठ्या संख्येने पालक, डॉक्टर, अधिकारी आणि नागरिक उपस्थित राहिल्याने कार्यक्रमाला विशेष उंची लाभली.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद लातूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, समाजकल्याण सभापती उत्तम माने, समाजकल्याण अधिकारी तथा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोष कुमार नाईकवाडी, शाखा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी राजीव गायकवाड, ॲड. अण्णाराव पाटील, नगरसेविका रागिनी यादव यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर डॉ. हर्षवर्धन राऊत (खच अध्यक्ष), डॉ. विश्रांत भारती (खच सचिव), डॉ. विद्या कांदे (खझ अध्यक्ष), डॉ. मंगेश डाके (खझ सचिव), डॉ. श्वेता काटकर, डॉ. शैला सोमाणी, शैलेश गोजमगुंडे, डॉ. मनसुद सुनील हाके (मुख्याध्यापक, जि.प. शाळा), जगदीश साबळे (ग्रँड हॉटेल, लातूर) तसेच जिल्हा परिषद कर्मचारी व 'उमंग'चे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांनी सांगितले की, २ एप्रिल हा दिवस केवळ औपचारिक नसून माणुसकीचा संदेश देणारा आहे. ऑटिझम हा आजार नसून मुलांच्या मेंदूच्या विकासाची वेगळी प्रक्रिया आहे. योग्य वेळी निदान (एरीश्रू ऊळरसपेीळी) आणि योग्य उपचार (एरीश्रू खपीशीींशपींळेप) मिळाल्यास ही मुले मुख्य प्रवाहात सक्षमपणे सहभागी होऊ शकतात. त्यांनी पुढे नमूद केले की 'उमंग' केंद्राने हजारो मुलांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणला असून ग्रामीण भागातील पालकांसाठी निवास व्यवस्था उपलब्ध करून देणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. प्रशासन, डॉक्टर आणि पालक यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच हा उपक्रम यशस्वी ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. हर्षवर्धन राऊत यांनी आयएमएतर्फे दिव्यांग मुलांसाठी कोणत्याही वेळी मदत करण्याचे आश्वासन दिले, तर डॉ. विद्या कांदे यांनी पालकांना योग्य औषधोपचार आणि मार्गदर्शनाचे महत्त्व पटवून दिले. यावेळी डॉ. प्रशांत उडगे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ऑटिझम हा आजार नसून मुलांची जग पाहण्याची वेगळी दृष्टी आहे. त्यांना बदलण्याची नाही, तर समजून घेण्याची आणि स्वीकारण्याची गरज आहे. त्यांनी पुढे 'एरीश्रू ऊळरसपेीळी' आणि 'एरीश्रू खपीशीींशपींळेप' यांचे महत्त्व अधोरेखित करत विविध थेरपींच्या साहाय्याने मुलांचा सर्वांगीण विकास शक्य असल्याचे स्पष्ट केले. स्वीकार हीच खरी थेरपी आणि प्रेम हीच खरी शक्ती हा संदेश देत समाजाने या मुलांना विशेष म्हणून स्वीकारण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमात दिव्यांग मुलांसाठी चित्रकला, विविध खेळ आणि सांस्कृतिक सादरीकरण अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे जिल्हा परिषद दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांनीही या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. चित्रकला, खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत आपले कौशल्य सिद्ध केले. त्यांच्या सहभागामुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला आणि इतर मुलांसाठी प्रेरणादायी ठरला. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

'उमंग' केंद्राच्या कार्याचा आढावा घेताना असे सांगण्यात आले की, आतापर्यंत हजारो मुलांनी येथे उपचारांचा लाभ घेतला असून लाखो थेरपी सत्रांद्वारे अनेक कुटुंबांना आधार मिळाला आहे. ग्रामीण भागातील मुलांपर्यंत सेवा पोहोचवण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात असून लातूरपासून सुरू झालेला हा प्रवास आता राज्यातील इतर शहरांपर्यंत विस्तारला आहे. भविष्यात प्रत्येक जिल्ह्यात अशा सेवा उपलब्ध करून देण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी 'उमंग'चे प्रकल्प संचालक किरण उटगे, व्यवस्थापक ॲड. श्रीहरी गोरे, कठ व प्रशासन व्यवस्थापक रामेश्वर जाधव, डॉ. श्रीशैल्यम तलारी, गणेश डोंगरे, डॉ. अर्जुन राठोड, डॉ. वैष्णवी शिंगण, डॉ. प्रवीण राठोड, डॉ. प्रतीक केंद्रे, डॉ. प्रगती रामटेके, डॉ. आशिष शिंदे, विवेक हनवते, हरीश पोटले, हसन चौस, सादिक शेख, मेहराज खान, माणिक करमळे, अभिजीत नरवटे, केदार पंडित, प्रतीक्षा टिपराळे, गौरी कांबळे, कोमल राठोड, साहिल, स्वप्नील डोडके पाटील, अमीन शाह, वैष्णवी शेटे, अंजली बिराजदार, शीतल कांबळे, विजय सुरवसे, सीमा साबळे, गणेश मुळे, किरण चोपडे, हर्षवर्धन राठोड, राजेंद्र राठोड, प्रतीक महानुरे, सचिन तुरे, प्रिती ठाकूर, आरती पंचाळ, संजना कदम, अक्षय भोई, अक्षय शिंदे, अदिती सोलुंके, उषा सुरकुटे, अमृता लोंढे, रोहिणी वाघमारे, शीला कराड, लक्ष्मी कदम यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच दिव्यांग मुलांचे पालक, जिल्हा परिषद कर्मचारी, जिल्हा परिषद विशेष शाळेचे शिक्षक, कर्मचारी आणि 'उमंग'चे सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकूणच, 'उमंग'चा हा उपक्रम दिव्यांग बालकांच्या कलागुणांना वाव देत त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या दिशेने प्रेरणादायी आणि मोलाचा ठरला असून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणारा ठरला आहे.

# डॉ. अशोक पोद्दार यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा

लातूर : येथील प्रसिध्द अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अशोक पोद्दार यांचा ५५वा वाढदिवस विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, मोफत हाडांचा ठिसूळपणा तपासणी शिबिर आदी विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला.



डॉ. पोद्दार ऍक्सिडेंट ऍण्ड ट्रॉमा केअर सेंटरच्यावतीने मागील २८ वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. या अंतर्गत जिल्हाभरात आतापर्यंत १७० मोफत आरोग्य शिबिरे घेण्यात येऊन रुग्णांना अल्प दरात औषधीचे वितरण करण्यात आले. दरवर्षी उन्हाळ्यात हॉस्पिटलसमोर पाणपोई सुरू करण्यात येते. शुक्रवारी डॉ. अशोक पोद्दार यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त हॉस्पिटलतर्फे रुग्णांची मोफत हाडांच्या ठिसूळपणाची तपासणी करण्यात आली. राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच संकुलाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे व अध्यक्ष के. ए. जायेभाये यांनी डॉ. पोद्दार यांचा सत्कार केला. यावेळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, सामाजिक कार्यकर्ते अभिजीत देशमुख, आयएमएचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. अभय कदम, डॉ. दीपक गुगळे, डॉ. सुरेश भट्टड, डॉ. सुबोध सोमाणी, डॉ. विश्वास कुलकर्णी, जयेश बजाज, डॉ. प्रसाद उदगीरकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# गडचिरोलीत जमीन संपादन शेतकरीहित जपूनच; जबरदस्ती नाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर : गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यात प्रस्तावित उद्योगासाठी जमीन संपादन करताना शेतकऱ्यांचे हित अबाधित ठेवले जाईल. कोणत्याही परिस्थितीत जबरदस्ती केली जाणार नाही आणि संबंधित शेतकऱ्यांना जास्तीत जास्त योग्य मोबदला देण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

रामगिरी येथे आज गडचिरोलीचे आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांच्या नेतृत्वाखाली चामोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी सहपालकमंत्री ड. आशिष जयस्वाल यांच्यासह संबंधित पदाधिकारी उपस्थित होते.



मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, गडचिरोली जिल्हा औद्योगिक विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असून 'लोह व पोलाद हब' म्हणून उदयास येत आहे. या पार्श्वभूमीवर उद्योग उभारणीसाठी जमीन संपादन आवश्यक असले तरी शासनाचा उद्देश शेतकऱ्यांवर कोणत्याही प्रकारची सक्ती करण्याचा नाही. सर्व संबंधित घटकांशी सविस्तर चर्चा करून सामंजस्याने मध्यम मार्ग काढत जमीन संपादनाची प्रक्रिया राबविण्यात येईल, असे ते म्हणाले.

उद्योगांच्या माध्यमातून स्थानिक भूमिपुत्रांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होतील, यावर भर देत त्यांनी सांगितले की, जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय्य मोबदल्यासोबतच पुनर्वसनाचीही योग्य व्यवस्था केली जाईल. विकास प्रक्रियेत सर्वांना सहभागी करून घेण्याचा शासनाचा प्रयत्न असून, शेतकऱ्यांनीही सकारात्मक भूमिका घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कोणाचीही जमीन बळजबरीने घेण्याचा शासनाचा कोणताही मानस नसून स्वेच्छेने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ देण्याचा प्रयत्न राहील. तसेच स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील, असेही मुख्यमंत्री यांनी स्पष्ट केले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.